समरी फौ. खटला.नं.२५४/२०२२
नि.२२ लगत

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | **:-** | **पृथ्वीराज मालोजीराव पिसाळ देशमुख** |
| **वय** | **:-** | **४४ वर्षे** |
| **व्यवसाय** | **:-** | **शेती** |
| **पत्ता** | **:-** | **ओझर्डे, ता.वाई जि.सातारा.** |

**सरतपास फिर्यादीतर्फे ॲड. श्री. डी.पी. धुमाळ यांचेमार्फत शपथेवर सुरु -**

१०. आरोपीने मला एच.डी.एफ.सी. बँकेचा दिनांक २५.०१.२०२२ रोजीचा रक्कम रुपये १२,५०,०००/- चा चेक दिला. त्यावरील हस्ताक्षर व सही आरोपीची आहे. ती मी ओळखतो. त्यास **निशाणी ३२** देण्यात येते.

११. सदरचा धनादेश मुदतीत जिल्हा मध्यवर्ती बँकेत भरल्यानंतर बँकेकडुन दिनांक ११.०२.२०२२ रोजी रिटर्न मेमो आला. त्यावर बँक अधिका-यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ३३** देण्यात येते. सदरचा रिटर्न मेमो प्रत्यक्षात दिनांक १७.०२.२०२२ रोजी मिळाल्याचे डी.सी.सी. बँकेचे पत्र आहे. त्यावर बँके अधिका-यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ३४** देण्यात येते.

१२. धनादेश बँकेत भरल्यानंतर दिनांक ०८.०२.२०२२ रोजीची डी.सी.सी. बँकेची स्लीप मला दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर बँकेच्या अधिका-यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ३५** देण्यात येते.

१३. धनादेश न वटता परत आल्याने दिनांक २२.०२.२०२२ रोजी मी वकीलांतर्फे आरोपीला रजिष्टर पोष्टाने नोटीस पाठवली. आता मला सदर नोटीसची स्थळप्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी व माझ्या विधीज्ञांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ३६** देण्यात येते.

१४. सदरची नोटीस आरोपीला मिळाल्याची पोष्टाची पोहोच पावती आहे. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्यास **निशाणी ३७** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. डी.आर.कांबळे यांचे मार्फत शपथेवर सुरु-**

१५. ओझर्डे गावात पिसाळ व पिसाळ देशमुख आडनाव लावणारे अनेक लोक आहेत हे म्हणणे खरे आहे. मी शेती व्यवसाय करतो. शेती व्यवसाया व्यतिरिक्त मी काही करत नाही. माझे उत्पन्नाचे साधन शेती आहे व त्यावर माझा खर्च चालतो.

१६. आरोपी चंद्रकांत लक्ष्मण गोळे कुठे व काय म्हणुन नोकरी करत होते हे मला माहित नाही. सन २०२२ मध्ये ते नोकरी करत नव्हते. मी स्वतःहुन सांगतो ते कंप्युटरचा व्यवसाय करत होते. नोकरी व व्यवसाय या दोन्ही वेगळया गोष्टी आहेत हे मला माााहित आहे. फिर्यादीत आरोपीचा धंदा नोकरी असा का लिहला आहे हे मला माहित नाही. फिर्याद दाखल करते वेळी मी आरोपी नोकरी करतो असे माइया वकीलांना सांगितले नव्हते हे म्हणणे खरे आहे. फिर्याद दाखल करताना ती वाचुन मी सही केली होती.

१७. आरोपीला मी ७ ते ८ वर्षापासुन ओळखतो. माझी व आरोपीची ओळख सिध्दनाथवाडी वाई येथे आरोपीचे असलेल्या कंप्युटर इंन्स्टीटयुट मध्ये इलेक्शनचे फॉर्म भरण्यासाठी गेलो त्यावेळी झाली. मी सन २०१५-२०१६ मध्ये फॉर्म भरण्यासाठी गेलो होतो.

१८. माझी शेती वडिलार्जीत आहे हे म्हणणे खरे आहे. मला एकुण ६ एकर शेती आहे. मला एक बहिण आहे. शेती मी एकटा पाहतो. मी फिर्यादीमध्ये शेती सोडुन छोटे मोठे व्यवसाय करतो किंवा कसे हे मला आठवत नाही. फिर्याद दाखल करतेवेळी मी छोटे मोठे व्यवसाय करतो हे वकीलांना सांगितले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. मी शेती व्यवसाय करुन छोटे मोठे व्यवसाय करत नव्हतो. सन २०१५-२०१६ मध्ये मी आरोपीला पहिल्यांदा भेटलो त्यानंतर मी आरोपीला मैत्रीच्या कारणावरुन भेटत होतो. वाई परिसरात माझे बरेच मित्र आहेत.

प्रश्न - तुमच्या जवळच्या सर्व मित्रांना अडचणीच्या वेळी तुम्ही मदत करत होता का ?

उत्तर - ज्यांना गरज असेल त्यांना मदत करत होतो.

१९. आरोपी सोडुन मी अन्य कोणाला मदत केली किंवा कसे हे मी आता सांगु शकत नाही. आरोपीने पहिल्यांदा रोख रक्कम ५०,०००/- मागितले. मी आरोपीला ५०,०००/-

सन २०१९ मध्ये दिले.

२०. आरोपीने सदरची रक्कम मला परत दिली. आरोपीला पहिल्यांदा रोख रक्कम रुपये ५०,०००/- जे दिले ते माझ्या खात्यातुन काढुन दिले होते. माझ्या बँकेची एकुण ॲक्सेस बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, युनियन बँक, व दोन पतसंस्था रविउदय व अजिंक्य ग्रामीण पतसंस्था ओझर्डे येथे खाती आहेत. कोणत्या बँकेतुन काढुन दिले ते मला सांगता येणार नाही.

२१. आरोपीला कोणता व्यवसाय करायचा होता व त्यासाठी त्याला किती भांडवल लागणार हे आरोपीने मला सांगितले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. कुठल्या व्यवसायासाठी व किती पैसे आरोपीने मागितले होते हे मी माझ्या वकीलांना सांगितले नव्हते. आरोपीने १२,५०,०००/- रक्कम सन २०१९-२०२० व २०२१ मध्ये घेतली. सन २०१९-२०२० व २०२१ मध्ये किती रक्कम घेतली हे मला सांगता येणार नाही.

२२. सन २०१९-२०२० व २०२१ मध्ये दिलेले पैसे कधी ऑफीसमध्ये कधी बाहेर असे रोखीने दिले. सदरचे पैसे आरोपीच्या ऑफीसमध्ये दिले. आरोपीच्या ऑफीसमध्ये किती व हॉटेलमध्ये किती पैसे दिले हे मला सांगता येणार नाही. मी पैसे दिलेल्या हॉटेलचे नाव मिलन आहे.

२३. मी सरतपासाचे शपथपत्र वाचुन सही केली आहे. माझ्या सरतपासातील पान क्रमांक २ मधील मजकुर आरोपीने माझ्याकडे रक्कमेची मागणी केली असता आरोपीला आजपर्यंत वेळोवेळी रोख रक्कम रुपये १२,५०,०००/- दिले बरोबर आहे. मी सरतपासाचे शपथपत्र दिनांक २३.०४.२०२४ रोजी दिले आहे. मी सन २०१८ पासुन २०२१ पर्यंतचे सर्व बँकांचे खातेउतारे दाखल करण्यास तयार आहे.

२४. आरोपीने कोणत्या लोकांना किती रक्कम हातउसने दयायचे आहेत हे सांगितले नव्हते.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत**

SMRUTI SAGAR PALSULE

Digitally signed by SMRUTI SAGAR PALSULE
Date: 2024.11.08 17:16:07 +0530

**(एस.एस.पळसुले)**

**दिनांक :- ०७.११.२०२४** **तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर,वाई**